**मुख्य अभियंता ( विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट-क संवर्गातील बाहयक्षेत्रिय तांत्रिक पदांना संगणक अर्हता परीक्षेत सूट देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संअप २०१९/प्र.क्र. १७९/२०१९/सेवा-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ०७/०७/२०२०**

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.५/२००१/३९ दि. २० जुलै, २००२.
२) सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय शासन निर्णय क्र. मातंसं/नस्ती०४/२२४/३९ , दि. २६ मे, २००४.
३) मुख्य अभियंता ( विद्युत), मुंबई यांचे पत्र क्र. मु.अ.(वि)/का.२-३/२२१४/२०१९, दि. ०५ नोव्हेंबर, २०१९.

**प्रस्तावना :**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दि. २६/५/२००४ मधील अनुक्रमांक ३ मध्ये ज्या पदांना संगणक प्रशिक्षण आवश्यक नाही अशा पदांना संबंधित विभागाच्या सचिवांना संगणक अर्हता परिक्षेतून सूट देता येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे. या अनुषंगाने मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी संदर्भाधीन क्रमांक ३ च्या दि. ०५ नोव्हेंबर, २०१९ च्या पत्रान्वये "त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील बाहयक्षेत्रिय चौदा तांत्रिक पदांची कर्तव्ये विचारात घेता या पदांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची" विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने उक्त पदांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन क्रमांक २ येथील माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि. २६ मे, २००४ मधील तरतुदींनुसार मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई कार्यालयाच्या अधिनस्त खालील चौदा बाह्यक्षेत्रिय तांत्रिक पदांना, त्यांची कर्तव्ये विचारात घेता, संगणक अर्हता परिक्षेतून सूट देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | अ.क्र. | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | वातानुकूल यांत्रिक | ८. | तारतंत्री |
| २. | पंप यांत्रिक | ९. | इलेक्ट्रानिक यांत्रिक |
| ३. | उद्वाहन यांत्रिक | १०. | इलेक्ट्रानिक-यांत्रिक-नि-चालक |
| ४. | प्रशितक यांत्रिक | ११. | वातानुकूल चालक |
| ५. | वीजतंत्री-नि-वीजयांत्रिक | १२. | अग्निशामक |
| ६. | वीजतंत्री | १३. | तारमार्गतंत्री |
| ७. | प्रमुख तारतंत्री | १४. | मीटरवाचक |

२.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२००७०७१५३२१३४४१८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAISHALI MANISH SULE

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0e39186eb174ffc2d5d67d71804bf385073457ed31869 70cc74a272f3074c496, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=cacc4e5906a45e67bca76eac2f10992fbf69020ed4 ea4e45fa58b2a72eef683f, ou=PUBLIC WORKS, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VAISHALI MANISH SULE
Date: 2020.07.07 15:37:15 +05'30'

**( वैशाली सुळे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव (रस्ते) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) सचिव (बांधकामे) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) महालेखापाल-१/२ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
६) मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
७) मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई/पुणे/कोकण/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
८) मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, नवी मुंबई,
९) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
१०) सर्व सह सचिव व उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
१२) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
१३) संचालक, उपवने व उद्याने, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,
१४) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन ३९), मंत्रालय, मुंबई,
१५) प्रशासन-१/रो.आ.१/रो.आ.२ , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) कार्यासन (सेवा-४) संग्रहार्थ.